# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मालमत्ता कर संकलन विभाग

दि.१५/०१/२०२४

## जाहीर आवाहन
## अभय योजनेस मुदत वाढ

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत थकीत मालमत्ता कर धारकांसाठी राबविण्यात येत असलेल्या अभय योजनेस मालमत्ता धारकांकडून मिळत असलेल्या उदंड प्रतिसादामुळे अभय योजना 2023-24 च्या कालावधीत वाढ करण्यात येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार शहरातील इमारत व जमिनीवर महानगरपालिकेमार्फत कर आकारणी करून सदर मालमत्ता धारकांकडून मालमत्ता कर वसुल करण्यात येतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कराधान नियम ५१ नुसार नियम ४१ खालील शास्ती व नियम ५० खालील वसुली खर्चात पुर्णत: अथवा व अंशत: माफ करणेस महानगरपालिका आयुक्त यांना अधिकार आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दितील थकीत मालमत्ता धारकांना महानगरपालिकेमार्फत अभय योजना २०२३-२४ लागू करण्यात आलेली आहे.

१. **“अभय योजना २०२३-२४” चा कालावधी:-**

“अभय योजना २०२३-२४” चा कालावधी हा दि.१६/०१/२०२४ ते दि.२९/०२/२०२४ असा राहील.

२. **योजनेची व्याप्ती :-**

- “अभय योजना २०२३-२४” अंतर्गत दि.१५/०१/२०२४ रोजी पर्यंत थकीत मालमत्ता कर असेल अशा सर्व करदात्यांना तसेच मोबाईल मनोरेधारक कंपन्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.
- “अभय योजना २०२३-२४” नियम ४१ प्रमाणे आकारण्यात येणारा दंड (शास्ती) माफीचा तपशील खालीलप्रमाणे असेल

**नियम ४१ खालील दंड (शास्ती) माफीचा तपशील**

| अ.क्र. | कालावधी | जमा करायाच्या रक्कमेचा तपशील | नियम ४१ प्रमाणे आकारण्यात येणारा दंड (शास्ती/व्याज) माफीचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | दि.१६/०१/२०२४ ते दि.२९/०२/२०२४ | थकीत मालमत्ता कराची रक्कम +५०% दंड (नियम क्र.४१ अन्वये) रक्कमेचा एकरक्कमी भरणा केल्यास | ५०% |

३. **योजनेचे लाभ खालीलबाबीसाठी अनुज्ञेय असतील:-**

महाराष्ट्र महानगरपानिका अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम मधील नियम ४१ अन्वये आकारण्यात आलेला दंड (शास्ती) रक्कमेसाठी सदरची अभय योजना लागू राहील. इतर कोणत्याही रक्कमेत माफी देण्यात येणार नाही.

४. **अभय योजने अंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कम:-**

- सदर योजना वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अधिकृत तसेच अनधिकृत मालमत्ता धारकांसाठी लागू राहील.
- सदर योजना वर नमूद केलेल्या कालावधीत मालमत्ता कराचा भरणा केलेल्या रक्कमानाच लागू राहील. या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. योजना सुरु करण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

५. **अभय योजने नुसार करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इ. अभय योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी लागू असणाऱ्या अटीः-**

- ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा या कालावधीचे कोणतेही प्रलंबित असलेले अपील, पुर्ननिरिक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा. न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहिजे.
- जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुर्ननिरिक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा. न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका दाखल केली तर अभय योजनेनुसार संबंधित कालावधीसाठी दिलेली सवलत काढून घेण्यात येतील.
- दि.१६/०१/२०२४ ते दि.२९/०२/२०२४ या कालावधीत थकीत मालमत्ता कराची रक्कम + ५०% दंड (नियम क्र.४१ अन्वये) रक्कमेचा एक रक्कमी भरणा केल्यास उर्वरीत दंड (नियम क्र.४१ अन्वये) माफ करण्यात येईल.
- धनादेश हे अभय योजनेच्या कालावधीत कोणत्याही कारणास्तव न वठल्यास थकबाकीदारास या अभय योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही. तद्नंतर इतर दंड रक्कमसहीत वसुल करण्यात येईल.
- अभय योजनेचा लाभ घेऊन करचा भरणा केल्यांनतर सदर भरणा रक्कमे संदर्भात कोणत्याही प्राधिकरणापुढे/ न्यायाधिकरणापुढे कोणत्याही कारणास्तव दावा दाखल करता येणार नाही.

तरी सर्व थकीत मालमत्ता धारकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी अभय योजना २०२३-२४ या योजने अंतर्गत आपल्या थकीत मालमत्ता कराचा भरणा ऑनलाईन पद्धतीने करणेकरिता www.vvcmc.in या संकेतस्थळावर अथवा UPI (Phone Pe, Paytm, Google Pay etc.) व्दारे तसेच रोख स्वरूपात व धनादेशाव्दारे आपल्या जवळील कर भरणा केंद्रावर लवकरात लवकर करून महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

**मालमत्ता कर विभाग**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**